**भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, पलूस**

**अहवाल- भगवान बिरसा मुंडा जयंती निमित्त “*जन्जातीया गौरव दिन*”**

**दिनांक: नोहेंबर १५, २०२५**

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, पलूस येथे **१५ नोव्हेंबर २०२५** रोजी *“जन्जातीया गौरव दिन”* उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे यांनी जारी केलेल्या परिपत्रकानुसार भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये साजरा करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

या वर्षी भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात *“जन्जातीया गौरव दिन”* विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने आमच्या महाविद्यालयातही त्यांच्या योगदानाची, कार्याची आणि आदिवासी समाजासाठी केलेल्या संघर्षाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आर. जी. गायकवाड यांच्या प्रस्ताविक भाषणाने झाली. त्यांनी भगवान बिरसा मुंडा यांचे क्रांतिकारी जीवन, आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी केलेला उत्कट संघर्ष, सामाजिक सुधारणा तसेच स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यानंतर अध्यापकवर्गाने भगवान बिरसा मुंडा यांच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्याचा सविस्तर आढावा घेत विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा आणि राष्ट्रीय इतिहासातील त्यांचे योगदान याबद्दलही विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या माध्यमातून करण्यात आलेसंपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय . विभागप्रमुख डॉ.जी .आर . गायकवाड आणि सह समन्वयक-प्रायादव .बी .एस . यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेएनएसएस . स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेत भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वावर .लघुव्याख्याने सादर केली

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. अशोक हजारे यांचे मिळालेले सहकार्य व मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. एकूणच, *“जन्जातीया गौरव दिन”* हा उपक्रम भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, पलूस येथे अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आदिवासी स्वातंत्र्यवीरांविषयी आदरभाव, राष्ट्रीय अभिमान आणि सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ झाली.

**छायाचित्रे:**







**“जन्जातीया गौरव दिन निमित्त भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. आर. जी. गायकवाड.”**

| | |
|---|---|
| **राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख** | **सह-समन्वयक** |
| प्रा. डॉ. आर. जी. गायकवाड | प्रा. एस. बी. यादव |